जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २१.०५.२०२६**

‘ वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक महिला दलाल आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ’

ठाणे शहराच्या ‘‘शिवसागर वेज रेस्टॉरंट, बिझनेस स्क्वेअर,२७२, गोखले रोड, ठाणे (प.)’’ या ठिकाणी एक महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावून वेश्यागमनासाठी बोलवणार आहे अशी गुप्त माहिती, गुप्त माहितीदारामार्फत ठाणे गुन्हे शाखेच्या अंतर्गत असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वपोनिरी/वैशाली गोरडे यांना मिळाली होती.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर या शाखेने दिनांक २०/०५/२०२६ रोजी ‘शिवसागर वेज रेस्टॉरंट,बिझनेस स्क्वेअर,२७२, गोखले रोड, ठाणे (प.)’ या ठिकाणी सापळा लावून एक महिला दलाल आरोपीस १६:३५ वाजता ताब्यात घेवून लागलीच अटक करुन तीचे तावडीतून ०३ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आह. सदर महिला दलाल आरोपी विरुध्द ठाणेनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे दिनांक २१/०५/२०२६ रोजी ०२:२६ वा. गुन्हा रजि.नंबर १२६/२०२६ भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३ (१) १४३ (३) सह स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच ०३ पिडीत बळीत महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने मा.अधिक्षक, शांतीसदन, उल्हासनगर-५, जि.ठाणे येथे ठेवण्यात आले आहे.

सदर कारवाई ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे तसेच श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वपोनि/वैशाली गोरडे, मपोउनि/स्नेहल शिंदे, सपोउपनि/पाटील, पोहवा/महाले, पोहवा/सुवारे, मपोहवा/भगत, मपोअं/खरात, चापोअंम/निकम यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे